प्रकरण - V

पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण आणि देखरेख

प्रकरण V

पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण आणि देखरेख

घरांना आणि सार्वजनिक संस्थांना पिण्यायोग्य पाणी पुरवठा करण्यासाठी, पुरवलेल्या पाण्याची नियमित तपासणी करणे ही एक पूर्वअट आहे. दूषित पाण्याचे मानवी शरीरावर, विशेषतः अर्भके, लहान मुले, रोगप्रतिकारशक्ती कमी असलेले लोक आणि गर्भवती महिलांवर होणारे दुष्परिणाम सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर आहेत. त्यामुळे, पाण्याचे संभाव्य प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाण्यामुळे होणारे आजार टाळण्यासाठी पाण्याच्या नमुन्यांची तपासणी आणि पाण्याच्या स्रोतांवर देखरेख ठेवणे आवश्यक आहे.

पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण आणि देखरेख या दोन भिन्न, परंतु एकमेकांशी घनिष्ठ संबंधित क्रिया आहेत. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ही खात्रीशीर नळपाणी पुरवठा करणाऱ्या पुरवठादार/संस्थेद्वारे 'संनियंत्रीत' केली जाते, तर तळागाळातील पातळीवर पाण्याच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी ग्रामपंचायत किंवा तिच्या उपसमितीची, म्हणजेच व्हीडब्ल्युएससीची असते. याव्यतिरिक्त, जीएसडीएकडे राज्यातील भूजल संसाधनांचे अन्वेषण, विकास आणि संवर्धन तसेच पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

5.1 पाणी गुणवत्ता चाचणी

जेजेएमच्या डब्ल्युक्युएमएस वरील मार्गदर्शक तत्वांनुसार, उपविभाग/तालुका प्रयोगशाळेने त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व जलस्रोतांची चाचणी वर्षातून एकदा रासायनिक मापदंडांसाठी आणि दोनदा जिवाणूशास्त्रीय मापदंडांसाठी (मान्सूनपूर्व आणि मान्सूनोत्तर) आणि किमान 13 मूलभूत जल गुणवत्ता मापदंडांसाठी करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये तालुक्यातील सर्व स्रोतांचा समावेश असेल. पुढे, सकारात्मक चाचणी आलेले नमुने तात्काळ जिल्हा प्रयोगशाळेकडे पाठवायचे होते. जेजेएमच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 10.5 नुसार, राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना जल गुणवत्तेच्या स्थितीवर सनियंत्रण ठेवण्यासाठी नियमित आढावा बैठका घेणे आवश्यक होते. विहित वारंवारतेनुसार सर्व स्तरांवर प्रयोगशाळा चाचण्यांद्वारे जल गुणवत्ता सनियंत्रणाची नोंद करून, चाचणीचा माहिती आयएमआयएस पोर्टलवर सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

5.1.1 पाण्याच्या स्रोतांच्या गुणवत्ता चाचणीची कमतरता

आयएमआयएसमध्ये दर्शविलेल्या तालुकानिहाय चाचणीच्या आकडेवारीवरून लेखापरीक्षणामध्ये असे दिसून आले की, निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये ऑक्टोबर 2022 ते मार्च 2024 या कालावधीत पाण्याच्या स्रोतांच्या चाचण्यांमध्ये कमतरता होती, जसे की **तक्ता 16** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 16: निवडलेल्या जिल्ह्यांमधील तालुक्यांमध्ये पाण्याच्या नमुन्यांच्या तपासणीतील कमतरता

जिल्ह्याचे नाव	जिवाणूशास्त्रीय मापदंड		रासायनिक मापदंड
	मान्सूनपूर्व (टक्क्यांमध्ये)	मान्सूनोत्तर (टक्क्यांमध्ये)	(टक्क्यांमध्ये)
अहिल्यानगर	0 ते 93	0 ते 17	कोणतीही कमतरता नाही
ठाणे	11 ते 84	0 ते 56	कोणतीही कमतरता नाही
जळगाव	4 ते 53	7 ते 30	6 ते 19
सोलापूर	21 ते 97	3 ते 96	0 ते 11
पुणे	3 ते 100	0 ते 45	0 ते 54

स्रोत: विभागाने दिलेली माहिती

संबंधित जिल्ह्यांचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, जीएसडीए यानी उत्तर दिले की, प्रयोगशाळेत प्राप्त झालेल्या सर्व नमुन्यांच्या चाचण्या केल्या. तथापि, जलसुरक्षकाद्वारे (वाटरमन) नमुने गोळा करणे आणि आयएमआयएस मधील डेटा एंट्रीच्या समस्यांमुळे चाचण्यांमध्ये कमतरता दिसून आली.

डिसेंबर 2025 मध्ये झालेल्या निर्गमन बैठकीमध्ये, शासनाने सांगितले की, अकार्यक्षम जलस्रोत किंवा स्रोत कायमस्वरूपी बंद झाल्यामुळे, या स्रोतांमधून चाचणीसाठी पाणी गोळा केले गेले नाही, त्यामुळे चाचणीत कमतरता दिसून आली. पाणी गुणवत्ता व्यवस्थापन माहिती प्रणाली (डब्ल्युक्यूएमआयएस) मधून अकार्यक्षम स्रोत वगळण्याचा प्रस्ताव मार्च 2025 मध्ये एनजेजेएम कडे पाठवण्यात आला. संबंधित विभाग (एसडब्ल्युएसएम) पाण्याच्या सक्रिय/निष्क्रिय स्रोतांसंबंधीच्या माहितीवर सनियंत्रण ठेवेल.

5.1.2 फील्ड टेस्टिंग किट्स वापरून पाण्याची गुणवत्ता तपासणी

जेजेएम मार्गदर्शक तत्वांनुसार, ग्रामपंचायत आणि/किंवा तिची उपसमिती, म्हणजेच, व्हीडब्ल्युएससी/ पाणी समिती/ वापरकर्ता गट, इत्यादीं, फील्ड टेस्टिंग किट (एफटीके)/बॅक्टेरियोलॉजिकल व्हायल्स वापरून पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी करण्यासाठी आणि त्याचे निकाल सादर करण्यासाठी स्थानिक समुदायातील पाच महिलांना ओळखून, त्यांना प्रशिक्षण देऊन नियुक्त करावयाचे होते.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की;

- आयएमआयएस जेजेएम डॅशबोर्डनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील दोन[27] गावांमध्ये एफटीके द्वारे पाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी प्रत्येकी पाच महिलांना प्रशिक्षण देण्यात आले होते. तथापि, लेखापरीक्षणामध्ये प्रत्यक्ष पडताळणीदरम्यान असे आढळून आले की, एफटीके वापरून पाण्याची तपासणी करण्यासाठी प्रशिक्षित महिला एफटीके वापरून तपासणी करू शकल्या नाहीत. शिवाय, पुनतगावमध्ये तपासणीच्या निकालांची कोणतीही नोंद ठेवली जात नव्हती. कार्य.अभि. जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी सांगितले की, पाच महिलांना प्रशिक्षण दिले जाईल.
- लेखापरीक्षणामध्ये असे दिसून आले की ग्रामपंचायत फुलपाट तालुका धरणगाव जिल्हा जळगाव येथे एफटीके उपलब्ध नव्हते आणि केलेल्या पाण्याच्या तपासणीची नोंदही ठेवली जात नव्हती. कार्य.अभि. जिल्हा परिषद जळगाव यांनी सांगितले की, नंतर एफटीके उपलब्ध करून देण्यात आले आणि त्यानंतर ग्रामपंचायतीला नोंदी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

या उदाहरणावरून असे दिसून येते की, व्हीडब्ल्युएससी स्तरावर पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण आणि देखरेख निकृष्ट दर्जाची होती.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की, एफटीके द्वारे पाण्याची तपासणी सुनिश्चित केली जाईल आणि ग्रामपंचायत स्तरावर त्याची नोंद ठेवली जाईल.

5.1.3 पाणी गुणवत्ता चाचणी माहिती

पाणी गुणवत्ता व्यवस्थापन माहिती प्रणाली (डब्ल्युक्युएमआयएस) हे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सनियंत्रण आणि व्यवस्थापण करण्यासाठी विकसित केलेले एक ऑनलाइन पोर्टल आणि ॲप आहे. हे पोर्टल आणि ॲप जनतेला प्रयोगशाळेतील माहिती उपलब्ध करून देते आणि सुरक्षित पाण्यासाठी नमुन्यांची चाचणी करणे सुलभ करते. डब्ल्युक्युएमआयएस माहितीची छाननी केल्यावर, लेखापरीक्षणामध्ये खालील विसंगती आढळून आल्या:

- ठाणे जिल्ह्यातील निवडक चार गावांमध्ये[28], तपासणीसाठी आलेल्या नमुन्यांपेक्षा केलेल्या चाचण्यांची संख्या जास्त दाखवण्यात आली.

---

27 शिंगवे तुकाई आणि पुनतगाव तालुका नेवासा

28 कुकंभे आणि वेल्होळी बुद्रुक तालुका शहापूर आणि पिसे डोहाळे तालुका भिवंडी.

- अहिल्यानगरमध्ये, लेखापरीक्षणात असे आढळून आले की 2023-24 मध्ये, 561 दूषित नमुन्यांपैकी 495 दूषित नमुन्यांवर कारवाई करण्यात आली होती, आणि 66 दूषित पाण्याच्या नमुन्यांवरील कारवाई प्रलंबित होती.
- अहिल्यानगरमध्ये, विविध तालुक्यामधून प्राप्त झालेल्या 301 पाण्याच्या नमुन्यांची जिल्हा प्रयोगशाळांमध्ये तपासणी करण्यात आली नाही.

याविषयी चौकशी केली असता वरिष्ठ भूवैज्ञानिक, जीएसडीए, अहिल्यानगर यांनी (ऑक्टोबर 2024) सांगितले की, आयएमआयएसवर नोंदवलेल्या 66 नमुन्यांपैकी केवळ 22 नमुने प्राप्त झाले होते आणि डब्ल्युक्यूएमआयएस मध्ये दर्शविलेल्या 301 पाण्याच्या नमुन्यांची प्रलंबित चाचणी ही डेटा एंट्रीमधील त्रुटीमुळे होती.

- जळगाव जिल्हयात, 2021-22 ते 2023-24 या कालावधीत प्रयोगशाळेत प्राप्त झालेले 577 पाण्याचे नमुने तपासले गेले नाहीत. वरिष्ठ भूवैज्ञानिक, जीएसडीए, जळगाव यांनी सांगितले की, प्रयोगशाळांमध्ये प्राप्त झालेल्या सर्व नमुन्यांची तपासणी करण्यात आली होती, परंतु तपासणी अहवाल अद्याप अपलोड करायचे होते.

सार्वजनिक डोमेनमध्ये उपलब्ध असलेली अविश्वसनीय माहिती विभागाकडून पाण्याच्या गुणवत्ते बाबत कमकुवत सनियंत्रण निदर्शीत करते.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, जे नमुने प्रयोगशाळेच्या आवश्यक मापदंडांनुसार नव्हते, ते तपासणीसाठी नाकारण्यात आले. शिवाय, जे नमुने ऑनलाइन सादर केल्याचे दाखवले गेले, परंतु विहित वेळेत तपासले गेले नाहीत, ते प्रयोगशाळांमधील रिक्त पदांमुळे होते.

5.2 पाण्याच्या गुणवत्ता तपासणीसाठी पायाभूत सुविधा

राज्यात जीएसडीएच्या सहा प्रादेशिक, 28 जिल्हा आणि 144 उपविभागीय प्रयोगशाळा आहेत, जिथे पीएच, विद्युत वाहकता, कठीणपणा, क्लोराईड, कॅल्शियम, सोडियम, पोटॅशियम, सल्फेट, नायट्रेट आणि फ्लोराईड व लोह यांसारख्या अल्प प्रमाणातील घटकांसह विविध मापदंडांवर पाण्याच्या गुणवत्तेची चाचणी केली जाते.

5.2.1 राज्य प्रयोगशाळा स्थापन केलेली नाही

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 10.1 नुसार, राज्य प्रयोगशाळांनी जिल्हा/उपविभागीय/फिरत्या प्रयोगशाळांनी पाठवलेल्या सकारात्मक आढळलेल्या नमुन्यांसह, यादृच्छिक आणि सर्वसमावेशक भौगोलिक व्याप्ती असलेल्या सर्व

जिल्हास्तरीय प्रयोगशाळांमधील एकूण पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांपैकी किमान पाच *टक्के* नमुन्यांची तपासणी करावी, अशी तरतूद आहे.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, राज्य प्रयोगशाळा स्थापन झाली नव्हती.

याशिवाय, निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये, 2020-21 ते 2023-24 या वर्षांदरम्यान अनुक्रमे जिवाणूशास्त्रीय आणि रासायनिक चाचणीसाठी 9591 आणि 9471 पाण्याचे नमुने सकारात्मक आढळले. त्यामुळे, राज्य प्रयोगशाळेच्या अनुपस्थितीत, जिल्हा प्रयोगशाळांमधील पाच *टक्के* तपासलेल्या नमुन्यांची यादृच्छिक तपासणी केली गेली नाही.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की राज्य प्रयोगशाळेचे बांधकाम पूर्ण झाले असून ती जून 2026 पर्यंत कार्यान्वित होईल.

5.2.2 उपविभागीय प्रयोगशाळांची अधिमान्यता

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जिल्हा/उपविभागीय प्रयोगशाळांची स्थापना/ श्रेणीसुधारणेद्वारे जल गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण करणे आणि प्रयोगशाळा मूल्यांकन व सुधारणा योजना राबवून सनियंत्रण ठेवणे अपेक्षित होते, ज्यामध्ये पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांच्या मान्यतेचा समावेश आहे. जीएसडीएला त्यांच्या प्रयोगशाळांसाठी एनएबीएलकडून मान्यता/अधिस्वीकृती प्रमाणपत्र मिळाले. एनएबीएलकडून अधिस्वीकृतीसाठीच्या प्रमाणपत्रातील चाचणीच्या व्याप्तीमध्ये सात[29] मापदंडांवरील चाचणीचा समावेश होता. एनएबीएलकडून मान्यतेसाठीच्या प्रमाणपत्राच्या बाबतीत, मूलभूत पाणी गुणवत्तेच्या महत्त्वाच्या 11 मापदंडांवरील[30] चाचणीचा समावेश आहे

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, जीएसडीएला एनएबीएलकडून केवळ सहा प्रादेशिक आणि 28 जिल्हा प्रयोगशाळांसाठीच अधिस्वीकृती मिळाली होती, तर राज्यातील 143 उपविभागीय प्रयोगशाळांना एनएबीएलकडून अधिस्वीकृतीऐवजी केवळ मान्यता मिळाली होती. एका उपविभागीय प्रयोगशाळेला अद्याप एनएबीएलकडून मान्यता मिळणे बाकी होते.

लेखापरीक्षणात पुढे असेही आढळून आले की;

- अहिल्यानगर जिल्ह्यातील शिंगवे तुकाई गावात, उपविभागीय प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर पाण्याचा नमुना (ऑक्टोबर 2024)

29 विद्युत वाहकता, फ्लोराईड, लोह, नायट्रेट, पीएच, टीडीएस आणि एकूण कठीणता.

30 पीएच, गढूळपणा, एकूण विरघळलेले घन पदार्थ (टीडीएस), क्लोराईड, एकूण कठीणपणा, अल्कधर्मीपणा, कॅल्शियम, मॅग्नेशियम, रंग, वास आणि चव.

पिण्यासाठी योग्य असल्याचे आढळले. तथापि, त्याच स्रोतातील पाण्याचा नमुना जेव्हा लेखपरीक्षणाच्या सूचनेनुसार जिल्हा प्रयोगशाळेत तपासण्यात आला, तेव्हा तो (ऑक्टोबर 2024) रासायनिक तसेच जैविक दृष्ट्या अयोग्य असल्याचे आढळले.

- अहिल्यानगर जिल्ह्यातील काष्टी गावातील दोन जलस्रोतांमध्ये (ईएसआर-1 आणि 2), उपविभागीय प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर पाण्याचे नमुने (सप्टेंबर 2024) योग्य असल्याचे आढळले, तथापि, जिल्हा परिषदेच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी जिल्हा प्रयोगशाळेत तपासलेले पाण्याचे नमुने (सप्टेंबर 2024) जैविक दृष्ट्या अयोग्य असल्याचे आढळले.

वरील प्रकरणे उत्तम जल गुणवत्ता चाचणी यंत्रणेसाठी उपविभागीय प्रयोगशाळेच्या मान्यतेची गरज दर्शवतात. राज्य प्रयोगशाळेच्या अनुपस्थितीत, जीएसडीए दूषित पाण्याच्या नमुन्यांची त्वरित पुनर्तपासणी करण्यासाठी प्रणाली तयार करू शकले नाही.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की प्रयोगशाळेची मान्यता ही प्राविण्य चाचणीवर आधारित आहे आणि अधिस्वीकृती ही प्रयोगशाळेच्या आवारातच केलेले प्रत्यक्ष मूल्यांकन आहे. अधिस्वीकृती प्रक्रियेसाठी, प्रयोगशाळेला अधिक नोंदी ठेवाव्या लागतात, ज्यासाठी पूर्णवेळ मनुष्यबळाची आवश्यकता असते आणि काही ठिकाणी प्रयोगशाळेत मनुष्यबळाची जागा रिक्त आहे. सध्या सर्व उपविभागीय स्तरावरील प्रयोगशाळा एनएबीएल मान्यताप्राप्त आहेत, परंतु राज्य शासन योग्य वेळी सर्व उपविभागीय स्तरावरील प्रयोगशाळांच्या अधिस्वीकृतीसाठी प्रयत्न करेल.

5.3 इलेक्ट्रो-क्लोरिनेशन प्रणालीची स्थापना आणि कार्यान्वयन

इलेक्ट्रो-क्लोरीनेटर (ईसी) खारट पाण्यातून विद्युत प्रवाह प्रवाहित करून हायपोक्लोराइट तयार करतात. यामुळे पाणी निर्जंतुक होते आणि मानवी वापरासाठी सुरक्षित बनते. निर्जंतुकीकरणासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून ईसी बहुतेकदा ईएसआरच्या पाणी प्रवेशद्वाराच्या आधी/प्रवेशद्वारावर बसवले जातात. राज्यातील ग्रामीण भागातील गावकऱ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे यासाठी, पाणीपुरवठ्याकरिता प्रत्येक एसव्हीएसवर ईसी बसवणे आवश्यक होते.

एसडब्ल्युएसएमने जेजेएम अंतर्गत येणाऱ्या गावांकरिता राज्यातील एसव्हीएस मध्ये ईसीचे सर्वेक्षण, डिझाइनिंग, पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करण्यासाठी तीन एजन्सींना दोन टप्प्यांत (जून 2022 आणि मे 2023) कार्यारंभ आदेश (डब्ल्युओ) निर्गमित केले. राज्यातील 36,272 एसव्हीएस पैकी, 25,840

एसव्हीएस साठी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले, त्यापैकी 25,524 ईसी चा पुरवठा करण्यात आला. पुरवठा केलेल्या 25,524 ईसी पैकी, 16,224 ईसी स्थापित करण्यात आले (ऑक्टोबर 2025). पुरवठ्याच्या तुलनेत स्थापनेची प्रगती केवळ 63.56 *टक्के* होती. 13,745 ईसी कार्यान्वित करण्यात आले (ऑक्टोबर 2025), जे पुरवठ्याच्या 53.85 *टक्के* होते.

लेखापरीक्षणामध्ये निवडलेल्या सहा जिल्ह्यात असे दिसून आले की पुरवठा केलेल्या 4,932 ईसींपैकी 2,649 स्थापित केले गेले आणि 1,990 कार्यान्वित केले गेले. 723 ईसींचा पुरवठा अद्याप झाला नव्हता. **तक्ता 17** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, पुरवठ्याच्या तुलनेत ईसींचे कार्यान्वयन 40.34 *टक्के* होते.

तक्ता 17: पुरवठा, स्थापित आणि कार्यान्वित केलेल्या इलेक्ट्रो-क्लोरिनेटर्सची संख्या

जिल्ह्याचे नाव	पुरवठा करावयाच्या ईसींची संख्या	पुरवठा केलेल्या ईसींची संख्या	स्थापित केलेल्या ईसींची संख्या	कार्यान्वित केलेल्या ईसींची संख्या	पुरवठ्याच्या तुलनेत स्थापनेची टक्केवारी
अहिल्यानगर	952	945	629	497	66.56
जळगाव	1338	1299	681	562	52.42
कोल्हापूर	943	447	138	132	30.87
पुणे	1249	1228	731	526	59.53
सोलापूर	861	701	292	133	41.65
ठाणे	312	312	178	140	57.05
एकूण	**5655**	**4932**	**2649**	**1990**	**53.71**

स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की इलेक्ट्रो-क्लोरिनेशन युनिटची स्थापना आणि कार्यान्वयन हे पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनावर अवलंबून आहे. उर्वरित युनिट्स मार्च 2026 पर्यंत स्थापित केले जातील.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण नवीन योजना कार्यान्वित झाल्या असल्या तरी, ज्या विद्यमान योजनांमधून पाणी पुरवठा केला जात आहे, त्यांमध्येही इलेक्ट्रो-क्लोरिनेशन स्थापित करून कार्यान्वित करायचे होते.

निष्कर्ष

शासनाने सर्व स्रोतांमधून पाण्याची नियमितपणे तपासणी केली जाईल याची खात्री केली नाही. निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये जलस्रोतांच्या तपासणीत मोठी कमतरता होती. तपासणीसाठी मिळालेल्या नमुन्यांपेक्षा केलेल्या चाचण्यांची संख्या जास्त असणे, तालुक्यांमधून मिळालेल्या पाण्याच्या नमुन्यांची जिल्हा प्रयोगशाळांमध्ये तपासणी न होणे, प्रयोगशाळेत प्राप्त झाल्यानंतरही

नमुन्यांची तपासणी न होणे यांसारख्या घटनांवरून असे दिसून येते की, पाण्याच्या गुणवत्तेच्या तपासणीच्या माहितीत विसंगती होती. दूषित पाण्याच्या नमुन्यांवर कोणतीही कारवाई केली गेली नाही आणि प्रयोगशाळेत प्राप्त झाल्यानंतरही नमुन्यांची तपासणी केली गेली नाही. राज्य प्रयोगशाळा स्थापन झाली नसल्यामुळे आणि उपविभागीय प्रयोगशाळांना मान्यता मिळणे बाकी असल्यामुळे, पाण्याच्या गुणवत्तेच्या तपासणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळले.

शिफारशी

- *शासनाने राज्य प्रयोगशाळेची लवकरात लवकर स्थापना करून पाणी चाचणी सुविधा बळकट करण्याबरोबरच, पाणी गुणवत्ता चाचणी आणि अहवाल देण्याची प्रक्रिया अधिक मजबूत करावी.*
- *पाण्याच्या नमुन्यांच्या चाचणीची प्रक्रिया अधिक विश्वसनीय करण्यासाठी, शासनाने राज्यातील सर्व उपविभागीय प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता आणि अधिस्वीकृती देण्याचा विचार करावा.*